लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

पुणे, रविवार
७ जानेवारी २०१८

# रानावनात फिरल्याशिवाय नवे लेखक-संशोधक घडणार नाहीत

## ज्येष्ठ साहित्यिक मारुती चितमपल्ली यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी, पुणे

**वनाधिकारी म्हणून** काम करताना जंगल पायी तुडविली आहेत. कोषामध्ये राहिलो नाही म्हणूनच विविध प्रकारची कोशनिर्मिती करू शकलो, अशी भावना ज्येष्ठ साहित्यिक आणि पर्यावरणस्नेही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मारुती चितमपल्ली यांनी शनिवारी व्यक्त केली. सध्याच्या तरुणांना ग्रंथालये आणि प्रयोगशाळांच्या कोषात राहायला आवडते. रानावनात फिरल्याशिवाय नवे लेखक आणि संशोधक घडणार नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवाअंतर्गत महाराष्ट्र साहित्य परिषद आणि स. प. महाविद्यालयाच्या सहकार्याने आयोजित पर्यावरणस्नेही साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून झाले. त्यानंतर चितमपल्ली यांनी पत्रकारांशी संवाद साधला. परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्राचार्य दिलीप शेठ, उपप्राचार्य प्रा. अनिल दुसाने, पर्यावरण विभागप्रमुख एच. जी. ठोंबरे आणि महोत्सवाचे संयोजक वीरेंद्र चित्राव या वेळी उपस्थित होते.



किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवाअंतर्गत महाराष्ट्र साहित्य परिषद आणि स. प. महाविद्यालयाच्या सहकार्याने आयोजित पर्यावरणस्नेही साहित्य संमेलनामध्ये संमेलनाध्यक्ष मारुती चितमपल्ली यांचा दिलीप शेठ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. मिलिंद जोशी आणि अच्युत गोडबोले या वेळी उपस्थित होते.

सध्याच्या युवा पिढीला पर्यटनासाठी जंगलात यायला आवडत असले तरी संशोधनासाठीच्या रानवाटा तुडविण्याची त्यांची तयारी नाही. जंगलात फिरताना नोंदी घेण्याऐवजी ही मंडळी कॅमेऱ्यातून छायाचित्र टिपण्यामध्येच आनंद मानते. प्रयोगशाळा आणि ग्रंथालयामध्ये बसून वन्यप्राणी आणि वनस्पतींचे संशोधन करण्यावर त्यांचा भर आहे, याकडे लक्ष वेधून चितमपल्ली म्हणाले,' समग्र लेखनासाठी अनुभवांची शिदोरी लागते. नोकरी आणि भटकंतीची आवड असल्याने मी अनेक वर्षे जंगलात फिरलो. वन्यप्राणी, पक्षी आणि जैवविविधता जवळून अनुभवली, म्हणूनच कोशनिर्मिती करू शकलो. पक्षिकोशाचे काम झाले आहे. प्राणिकोशाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. अजून वृक्षकोश आणि मत्स्यकोशाचे काम करावयाचे बाकी आहे.'

पर्यावरणाचे महत्त्व अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सकस साहित्यनिर्मिती झाली पाहिजे. सरकारने शाळांमध्ये पर्यावरण विषय सक्तीचा केला आहे, पण हा विषय शिकविणारे शिक्षकच नाहीत. भूगोल शिकविणारे शिक्षक त्यासाठी उपयोगात आणले जातात, असे सांगून चितमपल्ली म्हणाले, या कामात निसर्ग अभ्यासकांना सामावून घेण्याची गरज आहे. हा विषय वर्गात नाही, तर निसर्गात जाऊनच शिकविता येतो.

गोडबोले म्हणाले,की गरज नसताना वस्तूंचा साठा करणे आणि त्या सातत्याने बदलणे म्हणजे चंगळवादी होणे. तंत्रज्ञान माणसाला सुख, समाधान देत सोयीचे असल्याने ते वापरायलाच हवे.